जाक्र/२०१६जिपला/पशुसं/कार्या-४/सीआर-/कावि-836
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, लातूर
दिनांक :- २१/१०/२०१६

**आदेश**

याद्वारे सर्व जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी पवैद जि.लातूर यांना कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहितीची मागणी करणाऱ्या अर्जदारास ३० दिवसाचे आत माहिती देणे बंधनकारक आहे.असे असतानाही बऱ्याचदा प्रकरणे अकारण अपीलामध्ये जातात.कायद्याअंतर्गत महत्वाच्या बाबीमध्ये, माहिती मागणे हा राज्य घटनेने दिलेला अधिकार आहे तो कोणालाही नाकारता येत नाही. तसेच माहितीची मागणी करताच, माहिती एखाद्याच्या जिवीताच्या, रक्षणाच्या दृष्टीने अथवा मुक्ततेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास ४८ तासाचे आत उपलब्ध माहिती संबंधित अर्जदारास नियमानुसार तात्काळ देण्यात यावी. त्याचप्रमाणे माहिती संबंधितास मुदतीत न मिळाल्यास, सदर माहिती अर्जदारास मोफत मिळण्याचा अधिकार आहे. सदर बाबतीत वेळोवेळी विविध प्रशिक्षणांतर्गत प्रत्यक्ष भेटीत सूचना दिलेल्या आहेत.

तेंव्हा, याद्वारे सर्व जन माहिती अधिकाऱ्यास निर्देश देण्यात येत आहेत की, अर्जदारास माहिती न मिळाल्याच्या कारणावरून माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपील होणार नाहीत याची कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी. श्री अंगद दामोदर गायकवाड, रा.तांदुळजा ता.लातूर यांना बऱ्याचदा अशा प्रकाराला तोंड द्यावे लागल्याने त्यांना,"आपले सरकार पोर्टल" अंतर्गत प्रथम अपिलात प्रकरण गेल्याशिवाय माहिती मिळत नसल्याची तक्रार नाईलाजास्तव करावी लागली आहे.

सबब, माहिती अधिकार अधिनियम २००५ कायद्याचे गांभीर्य लक्षात घेऊन अर्जदारास विहित मुदतीच्या आत सर्व माहिती उपलब्ध करून दिली जाईल, तसेच उक्त कारणास्तव प्रकरण अपिलात जाणार नाही याची कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी. याबाबत अधिनस्त सहा.जनमाहिती अधिकाऱ्यास ही सक्त सुचित करण्यात यावे.

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, लातूर**

**प्रतिलिपी माहितीस्तव सादर**

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर**

**मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर**

प्रतिलिपी कार्यवाहीस्तव व अंमलबजावणीस्तव

जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी (सर्व) अंतर्गत जिल्हा परिषद, लातूर

याची एक प्रत श्री अंगद दामोदर गायकवाड, रा.तांदुळजा ता.लातूर यांना देऊन कळविण्यात येते की, आपण आपले सरकार पोर्टलमध्ये केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे आदेशीत करण्यात आले आहे.त्यामुळे आपले प्रकरण निकाली काढण्यात येत असून याउपरही आपणास माहिती मिळाली नसल्यास त्याच्या नावानिशी मागणी करणेस आपला अधिकार आहे.

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, लातूर**